# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

ई-मेलद्वारे

क्र. रानिआ/जिपपंस-२०२६/प्र.क्र.३/का-७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- १२/०१/२०२६

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
४. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व)

विषय :- निवडणुकीपूर्वी मतदान यंत्र तयार करणे (Commissioning of EVM) व मतदानाच्या दिवशी करावयाच्या मॉकपोल संदर्भात...

संदर्भ :- आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२६/प्र.क्र.३/का-७,दि.११/०१/२०२६

महोदय/महोदया,

**आयोगाचे संदर्भाधीन क्रमांकाचे दि.११/०१/२०२६ रोजीचे पत्र रद्द करण्यात येत असून सुधारीत निर्देश खालीलप्रमाणे आहेत:-**

राज्य निवडणूक आयोगाने भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) वापरण्याचा निर्णय घेतला असून, सन २००४-२००५ पासून प्रत्यक्ष वापरास सुरुवात केली आहे. मतदान यंत्र वापराबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासंदर्भातील आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. त्या अनुषंगाने वेळोवेळी झालेल्या सुधारणा / बदलांच्या संदर्भात देखील आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२) उपरोक्त विषयासंदर्भात भारत निवडणूक आयोगाच्या दि.२३ सप्टेंबर,२०१० रोजीच्या आदेशातील सूचना क्रमांक ८ मधील परिच्छेद ३ नुसार मतदान यंत्र तयार करण्यापूर्वी (Commissioning of EVM) वापरण्यात येणाऱ्या एकूण मतदान यंत्रांच्या १० टक्के मतदान यंत्रात किमान १००० मते नोंदवून मॉकपोल करण्याचे आदेश असून त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संदर्भाधिन पत्राद्वारे दि.२२ मे, २०१७ रोजी निर्देश निर्गमित केले आहेत. आता सदरचे दि.२२ मे,२०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले निर्देश अधिक्रमित करण्यात येत असून, पुढील प्रमाणे सुधारित निर्देश देण्यात येत आहेत:-

i) <u>मतदान यंत्र तयार करणे (कॅन्डसेट करण्याच्या वेळी)</u> (Commissioning of EVM):-

मतदान यंत्रे तयार करताना बॅलेट युनिटवर जितके उमेदवार सेट करण्यात आले असतील (नोटासहीत) तितक्या उमेदवारांसमोरील वापरात येणारे प्रत्येक बटण (नोटा बटणासहित) किमान दोन वेळा दाबून ते बटण व्यवस्थित सुरु असल्याची खात्री करण्यात यावी. तसेच या प्रक्रियेत उमेदवार अगर त्यांचे प्रतिनिधी यांना सुध्दा सहभागी करुन घेण्यात यावे. तसेच उपरोक्त प्रक्रियेमध्ये मत नोंदविल्यानंतर

Total बटण दाबून मतदानाची एकूण संख्या पाहण्यात यावी. त्यानंतर Close बटण दाबावे व त्यानंतर Result-I बटण दाबून निकाल पाहण्यात यावा. सर्वात शेवटी Clear बटण दाबून नोंदविलेल्या मतदानाची आकडेवारी ( Data) शून्य करण्यात यावा. या शिवाय कॅन्डसेट करण्याच्या वेळेस (Commissioning of EVM) वापरात नसलेली इतर सर्व बटणे व शेवटचे End बटण White masking tab ने बंद करण्याची दक्षता घ्यावी.

मतदान यंत्र तयार करताना उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी वेळेवर उपस्थित नसतील तरीही विहित केलेल्या वेळी त्यांच्या अनुपस्थितीत मतदान यंत्र तयार करण्याची कार्यवाही सुरु करावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत मतदान यंत्र तयार करण्याची प्रक्रिया पुढे ढकलू नये.

ii) <u>मतदानाच्या दिवशी सकाळी ६.३० वाजता मॉकपोल घेणे:-</u>

मतदानाच्या दिवशी सकाळी ६.३० वाजता मॉकपोल, उमेदवार अगर त्यांचे प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करण्यात यावे. मात्र उपरोक्त उमेदवार अगर त्यांचे प्रतिनिधी अगर मतदान प्रतिनिधी वेळेत उपस्थित झाले नाहीत तर त्यांच्यासाठी मॉकपोल थांबविण्यात येऊ नये. सदर मॉकपोलच्या वेळेस सर्व उमेदवारांना (नोटासहीत) किमान दोन मते देण्यात यावी म्हणजे प्रत्येक बटण किमान दोन वेळा दाबून व्यवस्थित सुरु असल्याची खात्री होईल.

उपरोक्त मॉकपोलसाठी मत नोंदविल्यानंतर Total बटण दाबून मतदानाची एकूण संख्या पहावी व त्यानंतर Close बटण दाबावे. त्यानंतर Result-I बटण दाबून निकाल पाहण्यात यावा व Clear बटण दाबून नोंदविलेल्या मतांची आकडेवारी ( Data) शून्य करण्यात यावी.

iii) <u>मॉकपोलच्या नोंदी ठेवणे :-</u>

उपरोक्त कँडिडेट सेटिंग (Commissioning of EVM) करण्यापूर्वी करावयाचे मॉकपोल व मतदान केंद्रावर करावयाचे मॉकपोल या दोन्ही मॉकपोलच्या नोंदी ठेवाव्यात. उपस्थित उमेदवार अगर त्यांचे प्रतिनिधी अगर यथास्थितीत मतदान प्रतिनिधी यांच्या सुध्दा स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

**तसेच कँडिडेट सेटिंग (Commissioning of EVM) करण्यापूर्वी घ्यावयाच्या मॉकपोलचे संपूर्ण Video Recording करुन ते जतन करावे.**

iv) <u>अन्य खबरदारी :-</u>

उपरोक्त मॉकपोल झाल्यानंतर मतदान यंत्रे सिलिंग करण्याची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले आदेश तसेच यथास्थितीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या माहिती पुस्तिकेत व मतदान केंद्राध्यक्ष यांच्या माहिती पुस्तिकेत दिलेल्या सुचनांप्रमाणे करण्यात यावी. तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) वापराबाबतच्या आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सुरक्षितता, गोपनियता,खबरदारी इत्यादी सर्व सुचनांचे व आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

शै.सु.वराडे
१२/०१/२०२६

(शैलेंद्र वराडे)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र